

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३८ • रविवार दि.१ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाणी आणि चाऱ्यासाठी मदत करा-खा.शरद पवार

सोलापूर:दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी आणि चाऱ्यासाठी शासनाने तातडीने मदतीच्या उपाययोजना कराव्यात अशा सुचना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांनी आज पत्रकारांशी बोलतांना केली आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून, शेतकरी आणि पशुधनासमोर पाणी व चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी गावोगावी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्याचा दोन दिवसांचा दुष्काळी दौरा सुरू केला आहे. या दौऱ्यात ते दुष्काळग्रस्त भागांना भेटी देऊन शेतकरी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांशी संवाद साधणार



आहेत. शेतकऱ्यांना पाणी आणि चाऱ्याची अत्यंत गरज आहे. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट करताना पवार म्हणाले की, जिल्ह्यातील १३९ गावांना सध्या १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विशेषतः माढा तालुक्यात पाणीटंचाईची तीव्रता अधिक असून, एकट्या माढा तालुक्यात ११० टँकर सुरू आहेत. या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आपण माढा तालुक्यातील दुधाळी परिसराला भेट देणार आहोत. यावेळी स्थानिक आमदार तसेच नागरिकांकडून पाणीटंचाई, शेती आणि पशुधनाच्या समस्यांची माहिती घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याच्या प्रश्नावर राज्य सरकारशी चर्चा झाल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. माझी दिल्लीमध्ये आणि मुख्यमंत्र्यांशी बैठक झाली आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काहीतरी मार्ग काढला जाईल, अशी मला खात्री आहे, असे ते म्हणाले. **पान ४ वर**

दिल्लीत विरोधकांची महारॅली रामलीला मैदानाला छावणीचे स्वरूप

नवी दिल्ली:केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (१ नोव्हेंबर) दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात २० विरोधी पक्ष सहभागी होणार असल्याने राजधानीतील राजकीय वातावरण तापले आहे. महारॅलीसाठी लाखभर आंदोलक येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, संभाव्य गर्दी लक्षात घेता रामलीला मैदान आणि परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे. सुरक्षेसाठी चार हजार पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

या महारॅलीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी (३१ ऑक्टोबर) काँग्रेसच्या वतीने पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी प्रतिसंसदेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानंतर रविवारी रामलीला मैदानावर महारॅली आणि महाआंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा आणि लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेचा मुद्दा उपस्थित करत इंडिया आघाडीने केंद्र सरकारवर दबाव निर्माण करण्याची रणनीती आखली आहे. महारॅलीपूर्वी राहुल गांधी यांनी आंदोलकांना विशेष आवाहन केले आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा; मात्र दिल्लीला आल्यानंतर रामलीला मैदान आणि परिसरातील बाजारपेठांमध्येही खरेदी करा, असे त्यांनी म्हटले आहे. दिवाळीचा सण जवळ आल्याने आंदोलन पुढे ढकलण्याची विनंती व्यापारी महासंघाने राहुल गांधी यांच्याकडे केली होती. व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर आंदोलनाचा परिणाम होऊ नये,या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी आंदोलकांना **पान ४ वर**



उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

नांदेड/प्रतिनिधी-शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे आज (रविवार) दुपारी नांदेड येथील श्री गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, आ. आनंद तिडके-बोंढारकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर तसेच आरोग्य आयुक्त संजय काटकर, जिल्हाधिकारी राहूल कर्डीले, जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी, महेश पाटील, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते.

९२ शिक्षकांची पदे रिक्त;९ शाळा चालतात शिक्षकांविना

माहूर तालुक्यात जि.प.च्या शैक्षणिक व्यवस्थेचा बोजवारा

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे शैक्षणिक व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. अर्धे शैक्षणिक वर्ष संपत आले तरी अनेक शाळांना शिक्षक मिळालेले नाहीत. विशेष म्हणजे जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असतानाही समायोजनाचा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

माहूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १२३ शाळा असून शिक्षकांची ३७५ पदे मंजूर आहेत. मात्र, प्रत्यक्षात केवळ २८३ शिक्षक कार्यरत असून तब्बल ९२ पदे रिक्त आहेत. तालुक्यातील ९ शाळा शून्य शिक्षकी, ३२ शाळा एकशिक्षकी तर ५५ शाळा द्विशिक्षकी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे.शिक्षक संघटनेने समायोजन प्रक्रियेविरोधात न्यायालयात प्रकरण दाखल केल्याने नियुक्त्यांचा प्रश्न अडकला असल्याचे बोलल्या जाते. या प्रकरणात शिक्षणाधिकारी किंवा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्थगिती आदेशाविरोधात योग्य कायदेशीर कार्यवाही करणे अपेक्षित असताना त्याबाबत ठोस पावले उचलली जात नसल्याची चर्चा आहे. परिणामी, शिक्षक उपलब्ध असूनही विद्यार्थ्यांना शिक्षकांअभावी शिक्षण घ्यावे लागत आहे. लोकप्रतिनिधींकडूनही या प्रश्नावर प्रभावी पाठपुरावा होण्याची गरज व्यक्त होत आहे.

काँग्रेसला चीनकडून देणगी मिळते का?

मुख्यमंत्र्यांचा राहुल गांधींना सवाल

ठाणे:काँग्रेसला चीनकडून मिळणाऱ्या कथित आर्थिक देणगीचा मुद्दा उपस्थित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडे स्पष्टीकरणाची मागणी केली, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या व्होट चोरीच्या आरोपांना प्रत्युत्तर देत काँग्रेसवर निशाणा साधला. ठाण्यात भाजपच्या वतीने आयोजित लोकतंत्र बचाव यात्रेत दोन्ही नेत्यांनी विरोधकांच्या राजकीय भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.



विरोधकांच्या इंडिया आघाडीकडून दिल्लीत सुरु असलेल्या आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी ठाण्यात भाजप व महायुतीकडून लोकतंत्र बचाव यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ठाण्यातील या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात काँग्रेस आणि चीन यांच्यातील कथित आर्थिक संबंधांचा मुद्दा उपस्थित केला. चीनकडून सातत्याने भारतविरोधी भूमिका घेतली जात असताना काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या ट्रस्टला चीनकडून देणगी का मिळते, असा सवाल त्यांनी केला. राहुल गांधी वारंवार परदेश दौरे करतात, त्यांच्या दौऱ्यांचा उद्देश काय आणि काँग्रेसला चीनकडून मिळणाऱ्या कथित देणगीमागील नेमके कारण काय, याचा खुलासा झाला पाहिजे, असे फडणवीस म्हणाले. चीनच्या पैशातून भारतात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.यावेळी फडणवीस यांनी संविधान आणि संवैधानिक संस्थांच्या मुद्द्यावरूनही काँग्रेसवर टीका केली. संविधानाच्या रक्षणाच्या घोषणा देणारेच सर्वोच्च न्यायालयासारख्या संस्थांवर प्रश्न उपस्थित करत असल्याचा आरोप त्यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान आणि त्यातून निर्माण झालेल्या संस्थांचा सन्मान राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या व्होट चोरीच्या आरोपांवरून काँग्रेसला प्रत्युत्तर दिले.२०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने शिवसेना-भाजप युतीला स्पष्ट जनादेश दिला होता; मात्र सत्तेसाठी काँग्रेससोबत जाऊन सरकार स्थापन करण्यात आले. हीच खरी मतांची चोरी असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. निवडणूक प्रक्रियेवर आणि ईव्हीएमवर विरोधकांना आक्षेप असेल, तर ज्या राज्यांत **पान ४ वर**

किनवट बाजार समितीच्या आर्थिक व्यवहारांची झाडाझडती

पाच वर्षांच्या व्यवहारांची चौकशी;४ नोव्हेंबरला महत्त्वाची सुनावणी

किनवट/प्रतिनिधी-लातूर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीमधील २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या कालावधीतील कथित आर्थिक, प्रशासकीय आणि कायदेशीर अनियमिततांची गंभीर दखल घेतली आहे. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबादच्या आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी आणि विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट) सुरू करण्यात आले असून, पुढील महत्त्वाची सुनावणी ४ नोव्हेंबर रोजी होणार असल्याचे प्राप्त पत्रावरून समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, या बाजार समितीमध्ये अनामत रक्कम, बनावट व अवाजवी बिले, जमीन विक्री आणि कर्मचारी भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप आहेत. या संदर्भात उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार विभागीय सहनिबंधक कार्यालयाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली आहे.या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी लातूर येथील विभागीय सहनिबंधक कार्यालयात पहिली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला नांदेडचे जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि किनवटचे सहाय्यक निबंधक उपस्थित होते. मात्र, किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संबंधितांकडून आवश्यक रेकॉर्ड आणि मूळ कागदपत्रे उपलब्ध न केल्यामुळे ही बैठक अपूर्ण राहिली.या गंभीर विषयाची दखल घेत विभागीय सहनिबंधकांनी आता पुढील बैठक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता त्यांच्या लातूर येथील कार्यालयात आयोजित केली आहे. या बैठकीसाठी किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन गोविंदराव मुंडे आणि सचिवांना सर्व मूळ रेकॉर्ड आणि कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. या बैठकीत सादर होणाऱ्या रेकॉर्डच्या आधारे पुढील चौकशी केली जाणार आहे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.



सिंहस्थ कुंभमेळा आणि दुष्काळाचे वास्तव!

नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध धार्मिक विधी करून, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. देश-विदेशातून लाखो भाविक या कुंभमेळ्यात सहभागी होणार असल्याने नाशिकच्या विकासाला चालना मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि आरोग्य सुविधांचा विस्तार होणे आवश्यक आहे. मात्र, या विकासाच्या धडपडीत पर्यावरणाचा बळी दिला जात असेल, तर त्याचे समर्थन कसे करायचे?, हा खरा प्रश्न आहे. कुंभमेळा हा धार्मिक श्रद्धेचा विषय आहे. गोदावरीत स्नान केल्याने पापांचे क्षालन होते, अशी भाविकांची धारणा आहे. प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर केला पाहिजे. परंतु ज्या गोदावरीला पवित्र मानले जाते, तिचे अस्तित्व टिकविण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. नदीचे पाणी प्रदूषित होत असेल, तिचे पात्र आकसत असेल आणि तिच्या परिसरातील नैसर्गिक संपत्ती नष्ट होत असेल, तर धार्मिक विधींचे पावित्र्य तरी कसे टिकणार? कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवन परिसरातील शेकडो झाडे जमीनदोस्त करण्यात आली. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. एकीकडे शासन 'झाडे लावा, झाडे जगवा' अशा आपण घोषणा देतो, वृक्षारोपणाच्या मोहिमा राबवतो; तर दुसरीकडे विकासकामांच्या नावाखाली वर्षानुवर्षे वाढलेले वृक्ष तोडले जातात. हा विरोधाभास केवळ घोषणांचा नाही, तर शासनाच्या पर्यावरणविषयक धोरणातील विसंगतीचा आहे. एका मोठ्या वृक्षाची जागा शंभर रोपे लावूनही तातडीने भरून निघत नाही. वृक्ष म्हणजे केवळ लाकूड किंवा सावली नव्हे; ते पाणी जमिनीत मुरवतात, तापमान नियंत्रित करतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात.विशेष म्हणजे, यंदा पावसाच्या अनिश्चिततेची आणि कमी पर्जन्यमानाची चिंता व्यक्त होत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या लहरीपणाचा धोका असताना जलसंधारण आणि वृक्षसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज होती. महाराष्ट्रातील अनेक भाग दुष्काळाच्या छायेत असताना नाशिकमध्ये कुंभमेळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. एका बाजूला लाखो भाविकांना गोदावरीत स्नान घालण्यासाठी व्यवस्था उभारली जात आहे, तर दुसरीकडे भविष्यात गोदावरीचे पाणी टिकविण्यासाठी नेमके काय केले जात आहे, याचा हिशेब मागण्याची वेळ आली आहे.कुंभमेळ्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होणार आहे. या निधीतून कायमस्वरूपी सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, तपोवनातील वृक्षतोड अपरिहार्य होती का? पर्यायी जागांचा विचार झाला होता का? वृक्षांना धक्का न लावता विकासकामे करता आली नसती का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने दिली पाहिजेत. विकासाच्या प्रत्येक प्रकल्पाला पर्यावरणीय नुकसानीची किंमत जोडली जाणार असेल, तर भविष्यातील पिढ्यांच्या वाट्याला कोणता निसर्ग येणार आहे? मागील कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीसारख्या दुर्दैवी घटना घडल्या होत्या. त्यातून प्रशासनाने धडा घेऊन गर्दीचे नियोजन, भाविकांची सुरक्षितता आणि आपत्कालीन व्यवस्थेला प्राधान्य देणे अपेक्षित आहे. मात्र, सुरक्षिततेच्या नावाखाली पर्यावरणाचा विध्वंस करण्याची मुभा मिळू शकत नाही. नियोजनातील दूरदृष्टीचा अभाव झाडांवर कुऱ्हाड चालवून भरून काढता येत नाही.भारतीय संस्कृतीत नद्या, वृक्ष, पर्वत आणि भूमी यांना पवित्र मानले गेले आहे. मग त्याच संस्कृतीच्या नावाखाली निसर्गाची हानी का केली जात आहे? श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोन्हींचे संरक्षण करणारे नियोजन करणे शक्य आहे. कुंभमेळा हा जलसंवर्धन, नदी स्वच्छता आणि वृक्षसंवर्धनाचा आदर्श निर्माण करण्याची संधी ठरू शकतो.सिंहस्थ कुंभमेळा काही दिवसांचा सोहळा आहे; परंतु तपोवनातील वृक्षांची हानी आणि गोदावरीच्या पर्यावरणाची हानी अनेक वर्षे भरून निघणार नाही. भाविकांच्या पापांचे क्षालन करण्यासाठी गोदावरीत स्नान केले जाईल; पण निसर्गाच्या विनाशाची जबाबदारी कोण स्वीकारणार? दुष्काळाच्या सावटात सुरू झालेल्या या कुंभमेळ्याने शासनाला किमान एक गोष्ट शिकवावी; धार्मिक उत्सवाचे यश गर्दीच्या संख्येवर नव्हे, तर निसर्गाचे अस्तित्व जपून केलेल्या नियोजनावर ठरले पाहिजे.



दवाखाना नाही, तर आरोग्य मंदिर!

वाडी (बु.) उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पणानिमित्त...

आजच्या काळात एखादा माणूस आजारी पडला की, त्याला सर्वात आधी चिंता वाटते ती दवाखान्यात किती पैसा लागेल याची! आजारापेक्षा उपचाराचा खर्च मोठा झाला आहे. अनेक वेळा औषधोपचारासाठी लागणाऱ्या पैशांच्या चिंतेनेच माणूस अर्धमेला होतो. गोरगरीब माणसाला तर खासगी दवाखान्याचा खर्च परवडत नाही. त्यामुळेच सरकारी दवाखाने हे लोकसंख्येच्या प्रमाणात आणि रुग्णांना सोयीस्कर आहे अशा ठिकाणी असणे ही आजच्या काळाची गरज आहे.

नांदेड शहराचा विचार केला तर डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय, शिवाजीनगर, जगमवाडी, इतवारा, तरोडा या भागांतील महानगरपालिकेचे छोटे-मोठे दवाखाने आहेत. भाग्यनगर येथे कस्तुरबा गांधी रुग्णालय आहे. मात्र, या दवाखान्यांमध्ये किती सुविधा उपलब्ध आहेत, याची माहिती नांदेडकरांना आहेच.कस्तुरबा गांधी रुग्णालयात बाळंतपणाची सुविधा असली, तरी चोवीस तास पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे रात्रीच्या वेळी अनेक रुग्णांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवावे लागते. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला आरोग्याच्या सुविधांसाठी मोठा प्रवास करावा लागतो. त्यात वेळ, पैसा आणि रुग्णाच्या जीवाचीही जोखीम असते.

अशा परिस्थितीत नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या मनात एक विचार आला की, नांदेडला आणखी एक उपजिल्हा रुग्णालय झाले पाहिजे!कारण ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेचा दवाखान्याचा खर्च वाचला पाहिजे, त्यांना वेळेवर उपचार मिळाले पाहिजेत, या भावनेतून आलेला होता.मग काय, आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी या कामाचा ध्यास घेतला. नांदेडची वाढती लोकसंख्या, विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयाचे अंतर आणि ग्रामीण भागातील जनतेची आरोग्याची गरज या बाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. उपजिल्हा रुग्णालयाची मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. २०२१ मध्ये या उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी मिळाली.सरकार कडून परवानगी मिळाली म्हणजे सगळे काम झाले असे नाही. त्यानंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो जागेचा!

रुग्णालयासाठी जागा कुठे असावी, यासाठी अनेक ठिकाणांची चाचपणी करण्यात आली. अखेर वाडी बुद्रुक येथील जागा निश्चित झाली. त्यासाठी तेथील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, प्रशासन यांच्याशी चर्चा करून जागेचा प्रश्न मार्गी लावला. त्यानंतर ५ मार्च २०२२ रोजी तत्कालीन कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे यांच्या शुभहस्ते रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी सुरू झालेल्या या आरोग्य मंदिराच्या उभारणीचा प्रवास सुरू झाला.पण पुढे निधीची अडचण होती. रुग्णालयाची इमारत उभी करण्यासाठी निधी मिळविणे, प्रशासकीय अडचणी दूर करणे आणि संबंधित विभागाकडून काम करून घेणे, हे सगळे सोपे नव्हते.


बालाजी पवार
नांदेड.

परंतु, मुर्ती लहान, किर्ती महान! अशी म्हण आहे. हि आमदार बालाजीरावांना लागू होते. आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी अनेक अडचणी व संकटं पार करत या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर निधी मंजूर झाला, भूमिपूजन झाले आणि हळूहळू रुग्णालयाची सुसज्ज इमारत उभी राहिली.अनेक अडचणी आल्या, अनेक प्रश्न निर्माण झाले, पण त्यावर मात करत आज वाडी येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभे राहिले आहे. एखादी दवाखान्याची इमारत आपल्या डोळ्यासमोर उभी राहते आणि तेथे हजारो नाही लाखो रुग्णांना सेवा मिळते हे ऐतिहासिक क्षण नाही तर काय...! तो ऐतिहासिक क्षण आलाय आज, रविवार दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत या उपजिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण होणार आहे.या निमित्ताने आमदार बालाजीराव कल्याणकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन! तसेच या कामासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले, शासनातील संबंधित अधिकारी, मंत्रालयातील संबंधित विभाग आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे मनःपूर्वक आभार!

कारण हे केवळ एक रुग्णालय नाही, तर ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेसाठी उभे राहिलेले एक आरोग्य मंदिर आहे.या आरोग्य मंदिराच्या माध्यमातून वाडी, लिंबगाव, नवीन वाडी, तळणी, नाळेश्वर यासह परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळणार आहेत. रुग्णांना वेळेवर उपचार मिळतील, उपचारासाठी शहरात धावपळ करावी लागणार नाही आणि अनेक कुटुंबांचा आर्थिक भारही कमी होईल, अशी अपेक्षा आहे.माझ्या मते, नांदेड शहराच्या चारही बाजूंनी अशा प्रकारची सुसज्ज उपजिल्हा रुग्णालये उभी राहिली पाहिजेत.तरोडा भागात एक आणि बोढार भागात एक असे आणखी दोन उपजिल्हा रुग्णालये उभारण्यात आली, तसेच तेथे दर्जेदार आरोग्य सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, आवश्यक औषधे आणि चोवीस तास सेवा उपलब्ध झाली, तर नक्कीच गोरगरीब रुग्णांना खासगी दवाखान्यांमध्ये जाण्याची गरज कमी होईल.

वाडी येथील हे आरोग्य मंदिर ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा आधार बनावे, हजारो रुग्णांना नवजीवन देणारे ठरावे आणि या रुग्णालयातून गरीब माणसाला चांगले उपचार मिळावे, हीच सदिच्छा! आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या या प्रयत्नांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार! उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब आणि या कार्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद!

राजकारणातही प्रशिक्षणाची गरज; लोकप्रतिनिधींना राजकीय संस्कारांचे धडे मिळावेत!



राजकारण हे केवळ निवडणुका लढविण्याचे, सत्ता मिळविण्याचे किंवा पदे भूषविण्याचे साधन नाही. राजकारण म्हणजे राष्ट्रसेवा, समाजसेवा आणि जनतेच्या प्रश्नांचे प्रामाणिकपणे निराकरण करण्याची जबाबदारी होय. मात्र, आजच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता अनेक लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्यातून या मूलभूत तत्त्वांचा विसर पडत असल्याचे जाणवते. त्यामुळे राजकारणात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला विद्यार्थ्याप्रमाणे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी आणि इतर व्यावसायिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार शिक्षण व प्रशिक्षण घ्यावे लागते. मग देशाचा कारभार आणि लोकशाही व्यवस्था सांभाळणाऱ्या लोकप्रतिनिधींना प्रशिक्षणाची आवश्यकता का नसावी?

आज काही आमदार, खासदार आणि इतर लोकप्रतिनिधींची बोलण्याची पद्धत अत्यंत खेदजनक आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून विरोधकांवर टीका करणे हा लोकशाहीचा अधिकार असला, तरी आई-वडिलांचा उद्धार करणारी भाषा वापरणे, शिवीगाळ करणे आणि सामान्य नागरिकांना मूर्ख समजणे हे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरू शकत नाही. अशा अहंकारी भाषेमुळे लोकप्रतिनिधींची प्रतिमा उंचावण्याऐवजी मलिन होते. ज्यांच्या मतांवर निवडून आलो, त्यांच्याशीच उद्धटपणे वागायचे असेल, तर लोकशाहीचा अर्थ तरी काय उरतो? निवडणुकीच्या काळात पैशांचे वाटप करणे, विविध प्रलोभने दाखविणे आणि सहानुभूती मिळविण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबणे, या गोष्टी लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहेत. काही लोकप्रतिनिधींच्या वैयक्तिक जीवनाबाबतही जनतेमध्ये अनेक चर्चा असतात. प्रत्येकाचे नाव घेणे मला योग्य वाटत नाही; मात्र जनता सर्व काही पाहत असते आणि वेळ आल्यावर त्याचा हिशेबही मागते. माझे वय आज ८० वर्षे आहे. या प्रदीर्घ आयुष्यात मी राजकारणातील अनेक बदल पाहिले आहेत. पूर्वीच्या लोकप्रतिनिधींमध्ये असलेली नम्रता, संयम आणि जनतेशी असलेली जवळीक आज अनेक ठिकाणी दिसून येत नाही, ही चिंतेची बाब आहे.

आज काही नवनिर्वाचित आमदार किंवा लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बोलताना अत्यंत खालच्या दर्जाची भाषा वापरतात. अधिकाऱ्यांना अपमानित करणे, त्यांच्यावर दबाव आणणे, त्यांच्या कामात अनावश्यक हस्तक्षेप करणे आणि आपल्या पदाचा प्रभाव दाखविणे, ही लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीची लक्षणे नाहीत. प्रशासनाला कायद्याच्या चौकटीत काम करावे लागते. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ तात्पुरता असतो; मात्र प्रशासकीय व्यवस्था सातत्याने कार्यरत असते. त्यामुळे अधिकाऱ्यांचा सन्मान राखणे आणि त्यांच्या कामात नियमबाह्य हस्तक्षेप न करणे आवश्यक आहे.लोकप्रतिनिधींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, सत्ता कायमस्वरूपी नसते. आज आपण एखाद्या पदावर आहोत, उद्या ते पद दुसऱ्या व्यक्तीकडे जाऊ शकते. त्यामुळे सत्तेचा उपयोग जनतेवर प्रभाव टाकण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी केला पाहिजे. अधिकाऱ्यांना धमकावून किंवा दबावाचे तंत्र वापरून चांगले प्रशासन निर्माण होत नाही. उलट अशा वर्तनामुळे प्रशासनातील कार्यक्षमता कमी होते आणि सामान्य नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो.

राजकारणात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने संविधानाचा, कायद्याचा आणि प्रशासकीय कार्यपद्धतीचा अभ्यास केला पाहिजे. लोकप्रतिनिधींना त्यांच्या अधिकारांची माहिती असणे जितके आवश्यक आहे, तितकीच त्यांच्या मर्यादांची जाणीव असणेही गरजेचे आहे. कोणत्या विषयात हस्तक्षेप करावा, कोणत्या विषयात प्रशासनाला स्वतंत्रपणे काम करू द्यावे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कायदेशीर मार्ग कोणते आहेत, याचे प्रशिक्षण त्यांना मिळाले पाहिजे.सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे नम्रता. पूर्वीचे अनेक लोकप्रतिनिधी सामान्य माणसांमध्ये सहज मिसळत असत. त्यांच्याकडे कोणताही नागरिक आपली अडचण घेऊन जाऊ शकत होता. आज मात्र काही लोकप्रतिनिधींच्या आसपास सुरक्षारक्षक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा मोठा गराडा असतो. सामान्य माणसाला त्यांच्यापर्यंत पोहोचणेही कठीण होते. जनतेने निवडून दिले म्हणजे जनता आपली नोकर झाली, असा समज करून घेणे चुकीचे आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक आहेत. जनतेने दिलेली जबाबदारी पार पाडणे हेच त्यांचे खरे कर्तव्य आहे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

संपत्ती, प्रतिष्ठा आणि सत्तेचा गर्व किती दिवस टिकणार? माणूस कितीही मोठा झाला, कितीही संपत्ती कमावली, तरी मृत्यूनंतर त्याच्या वाट्याला येणारी राख मोजकीच असते. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा सिकंदर बादशहासुद्धा रिकाम्या हातानेच गेला. त्याने जग जिंकले, पण मृत्यूला जिंकू शकला नाही. ही ऐतिहासिक घटना प्रत्येक सत्ताधाऱ्याने लक्षात ठेवली पाहिजे. संपत्ती इथेच राहणार आहे. त्यामुळे अहंकार, सत्तेचा दुरुपयोग आणि वैयक्तिक प्रतिष्ठेच्या मागे धावण्यापेक्षा समाजासाठी काहीतरी चांगले करून जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.देवस्थान, धार्मिक संस्था आणि सामाजिक व्यवस्थांमध्येही राजकीय हस्तक्षेप करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रत्येक संस्थेचे काही नियम, परंपरा आणि स्वतंत्र कार्यपद्धती असते. केवळ राजकीय पद आहे म्हणून प्रत्येक ठिकाणी हस्तक्षेप करणे योग्य नाही. लोकांच्या श्रद्धेचा आणि धार्मिक भावनांचा आदर करणे हेही लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे.

राजकारणात आज एक विचित्र प्रवृत्ती दिसून येते. कालपर्यंत एकमेकांवर गंभीर आरोप करणारे नेते दुसऱ्याच दिवशी एकत्र येतात. कधी एकमेकांचा सत्कार करतात, तर कधी त्यांच्याच विरोधात षडयंत्र रचल्याचे आरोप होतात. कधी सभागृहात भांडण, तर कधी एकाच ताटात जेवण! राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र त्यामागे कोणतीही वैयक्तिक स्वार्थाची भूमिका नसावी. विरोध हा विचारांचा असावा, व्यक्तीचा द्वेष करण्यासाठी नसावा. जनतेच्या प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन काम करणे हीच खरी लोकशाही आहे. यासाठी राजकीय प्रशिक्षणाची व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. यूपीएससी, एमपीएससी किंवा इतर स्पर्धा परीक्षांमधून प्रशासकीय सेवेत जाणाऱ्या उमेदवारांना अनेक वर्षे अभ्यास करावा लागतो. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच त्यांच्यावर मोठ्या जबाबदाऱ्या सोपवल्या जातात. मग आमदार, खासदार, नगरसेवक आणि इतर लोकप्रतिनिधींना कोणतेही मूलभूत प्रशिक्षण न देता महत्त्वाच्या जबाबदाऱ्या कशा सोपवल्या जातात? किमान निवडून आल्यानंतर त्यांच्यासाठी संविधान, कायदे, प्रशासन, अर्थसंकल्प, विकासकामे, लोकशाही मूल्ये, संवादकौशल्य आणि सार्वजनिक वर्तन यांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम अनिवार्य करण्याचा विचार झाला पाहिजे.

प्रशिक्षणामध्ये संयमाने बोलणे, विरोधकांचे म्हणणे ऐकून घेणे, अधिकाऱ्यांशी सन्मानपूर्वक संवाद साधणे, जनतेच्या तक्रारी समजून घेणे आणि कायदेशीर मार्गाने प्रश्न सोडविणे या बाबींवर भर दिला पाहिजे. राजकीय पक्षांनीही उमेदवार निवडताना केवळ आर्थिक ताकद, निवडून येण्याची क्षमता किंवा राजकीय प्रभाव न पाहता त्यांचे चारित्र्य, सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक वर्तन यांचा विचार केला पाहिजे.प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कामात अडथळे निर्माण करण्यासाठी आंदोलने करणे, नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत करणे आणि कायद्याच्या प्रक्रियेचा विचार न करता दबाव निर्माण करणे, हेही योग्य नाही. आंदोलन हा लोकशाहीतील अधिकार आहे; मात्र त्याला शिस्त आणि कायद्याची चौकट असली पाहिजे. न्यायव्यवस्थेतील विलंब, गुन्हेगारांना मिळणारा जामीन आणि तपासातील त्रुटी यांसारख्या विषयांवर लोकप्रतिनिधींनी अभ्यासपूर्ण भूमिका मांडली पाहिजे. न्यायव्यवस्थेवर टीका करण्यापेक्षा कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी विधिमंडळात ठोस प्रयत्न केले पाहिजेत.

प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यपद्धतीतून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचप्रमाणे काही व्यक्तींच्या वर्तनामुळे समाजात नकारात्मक प्रतिमा निर्माण होते. व्यक्तीचे मोठेपण त्याच्या पदावरून नव्हे, तर त्याच्या कर्मावरून ठरते. समाजाला चांगले काम करणाऱ्यांचे स्मरण राहते आणि चुकीचे काम करणाऱ्यांचीही नोंद इतिहासात होते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कर्माचा विचार केला पाहिजे. माझे वय ८० वर्षे झाले आहे. या वयात मला कोणत्याही राजकीय पक्षाचा द्वेष करायचा नाही किंवा कोणाची व्यक्तिगत बदनामी करायची नाही. मात्र, राष्ट्राचे भविष्य आणि लोकशाहीचे स्वास्थ्य याबाबत चिंता व्यक्त करणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य आहे. राजकारणात येणाऱ्या व्यक्तींनी स्वाभिमान जपावा; परंतु अहंकार बाळगू नये. सत्तेसाठी आपला स्वाभिमान विकून लाचारी पत्करू नये आणि सत्तेच्या जोरावर इतरांनाही लाचार बनविण्याचा प्रयत्न करू नये. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, लोकप्रतिनिधींनी आपल्या कुटुंबाची, समाजाची आणि मतदारसंघाची प्रतिष्ठा जपली पाहिजे. आपल्या मुलांना आपण कोणता आदर्श देत आहोत, याचाही विचार केला पाहिजे. मृत्यूनंतर आपले नाव लोकांनी आदराने घ्यावे, अशी इच्छा प्रत्येकाने बाळगली पाहिजे. त्यासाठी संपत्तीपेक्षा चांगले कार्य, पदापेक्षा माणुसकी आणि सत्तेपेक्षा सेवाभाव महत्त्वाचा आहे.

राजकारणात प्रशिक्षण अनिवार्य झाले पाहिजे. कारण लोकप्रतिनिधी केवळ निवडून येण्यासाठी नसतात, तर त्यांनी राष्ट्र घडविण्यासाठी निवडून आलेले असते. सत्ता ही मालकी नाही, ती जनतेने दिलेली जबाबदारी आहे. ही जाणीव प्रत्येक लोकप्रतिनिधीला झाली, तरच लोकशाही अधिक सक्षम, सुसंस्कृत आणि जनहितकारी बनेल.

जलसंवर्धनाचा संदेश देत ७५० हून अधिक नांदेडकरांची धाव!

नांदेड/प्रतिनिधी-थेंब थेंब महत्त्वाचा, पाणी वाचवा, भविष्य सुरक्षित करा हा जलसंवर्धनाचा संदेश देत श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी येथे आयोजित झेनिथ मॅरेथॉन २०२६ उत्साहात संपन्न झाली. संस्थेच्या वार्षिक क्रीडा महोत्सवांतर्गत टीम झेनिथच्या वतीने आयोजित या ५ किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत ७५० हून अधिक नागरिक, विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मॅरेथॉनचा प्रारंभ सकाळी ६ वा. पोलीस अधीक्षक कार्यालय येथून संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. शिवाजीनगर, आयटीआय कॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर आणि आनंदनगर मार्गे धावपटूंचा प्रवास नागार्जुना हॉटेल येथे संपन्न झाला. संपूर्ण मार्गावर उत्साहपूर्ण वातावरण अनुभवायला मिळाले.पारितोषिक वितरण समारंभात बोलताना संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे म्हणाले की, मॅरेथॉनच्या आयोजनामागे नागरिकांमध्ये आरोग्य आणि व्यायामाविषयी जागरूकता निर्माण करणे, तसेच महाराष्ट्र व मराठवाड्यातील पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचविणे हे प्रमुख उद्देश होते. निरोगी शरीरामुळे सकारात्मक विचारांना चालना मिळते. विद्यार्थ्यांनी केवळ तंत्रज्ञानाचे शिक्षण न घेता सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही जोपासली पाहिजे. या उपक्रमातून निर्माण झालेली जागरूकता जलसंवर्धनाच्या व्यापक चळवळीला प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मॅरेथॉनमधील विजेत्यांना एकूण ५० हजार रुपयांची रोख पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. पुरुष गटामध्ये प्रथम : ईश्वर झिरवाळ, द्वितीय : ऋषिकेश वावरे, तृतीय : दाजी हुबाळे तर महिला गटामध्ये प्रथम : प्रणाली शेगावकर, द्वितीय : परिमला बाळासाहेब बाबर, तृतीय : श्रद्धा मुंडेकर यांचा समावेश आहे. मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या सर्व धावपटूंना आकर्षक टी-शर्ट आणि ई-प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.मॅरेथॉनच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड जिल्हा थलेटिक्स संघटनेचे सचिव प्रलोभ कुलकर्णी, पंच ज्ञानेश्वर सोनसळे, कांचन मस्के आणि वैभव अंभोरे यांनी सहकार्य केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

ड्रोनच्या नजरेतून अवैध रेतीसाठेबाजी उघड

भंडारवाडी-पिंपरीत प्रशासनाची धाड;५० ब्रास रेती जप्त



किनवट/प्रतिनिधी-जलधरा मंडळातील भंडारवाडी-पिंपरी शिवारात साठेबाजी केलेल्या अवैध रेती साठ्यावर बोधडी वनविभाग, कोरटा वनविभाग आणि किनवट महसूल विभागाने ३१ ऑक्टोबर रोजी धाड घालून रेतीसाठा जप्त केलाय. पांढरकवडा वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक उत्तम फड यांच्या ड्रोनकॅमेऱ्याच्या प्रयोगातून रेतीसाठा प्रकरणाची खातरजमा झाली होती. पिंपरी येथील पैनगंगा नदीकाठालगतच्या सर्वे नंबर १४७ जवळ शेतात अंदाजे ५० ब्रास रेतीचा साठा आढळून आल्याचे सूत्रांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या शेतातील रेतीसाठ्या प्रकरणी त्या /१२ उताऱ्यावर दंडाचा बोझा चढविण्यात येणार की नाही, याबद्दलची स्पष्टता समोर आली नाही.

सतीश वाळकीकर यांनी पांढरकवडा वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक उत्तम फड यांच्याकडे पैनगंगा अभयारण्य क्षेत्रातील पिंपरी-भंडारवाडी परिसरात अवैध रेतीसाठा असल्याची तक्रार वजा माहिती दिली. या तक्रारीची गंभीर दखल घेत उपवनसंरक्षकांनी ड्रोनच्या माध्यमातून परिसराची पाहणी करण्याचे कोरटा वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांना आदेश दिले. ड्रोनच्या सहाय्याने एका शेतात मोठ्या प्रमाणात रेतीसाठा असल्याचे निदर्शनास आले. त्यावरुन त्यांनी बोधडी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी चंद्रकांत पोतुलवार यांना तातडीने सहकार्यासाठी पाचारण केले. वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल होऊन पहाणी केल्यानंतर संबंधित रेतीसाठा हा शेतकऱ्याच्या शेतात असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे पुढील कारवाईसाठी हा साठा महसूल प्रशासनाच्या स्वाधीन केला. सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवणन यांच्या आदेशानुसार व तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने पिंपरी येथील पैनगंगा नदीकाठावरील सर्वे क्रमांक १४७ जवळील अंदाजे ५० ब्रास रेतीसाठ्याचा पंचनामा करून पुढील आदेशापर्यंत तो जप्त केला.दरम्यान, बोधडी वनपरिक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना भंडारवाडी जंगलात चार ट्रॅक्टर रेतीसाठा आढळून आला. वनविभागाने हा साठा जप्त करून पंचनामा केला. जंगलातील अन्य ठिकाणीही रेतीसाठा केला जाऊ शकतो असा कयास लाऊन शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबवून पहाणी करण्यात येणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी चंद्रकांत पोतुलवार यांनी दिल्याचे वृत्त आहे.महसूल विभागाच्या पथकाने घटनास्थळी जाऊन केलेल्या कारवाईत रेतीसाठा जप्त केलाय. दरम्यान पथकात ग्राम महसूल अधिकारी सचिन धुमाळे, मंडळ अधिकारी शितल ढाकूलकर, कोतवाल माहुरे, वनपाल बडूरे, निलपत्रेवार, देंडके तसेच वनरक्षक गड्डे, काळे, तलांडे, लांडगे व खोत यांचा सहभाग दिसून आला.

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षकाने तुरुंगातूनच रचला कट

२७ किलो सोन्यासह १२ लाखांची रोकड लंपास;चौघांना अटक

जळगाव:तालुक्यातील भोकर येथील स्टेट बँकेत बंदुकीचा धाक दाखवत गोळीबार करून २७ किलो सोने आणि साडेबारा लाखांची रोकड लुटण्यात आली. मात्र, बँक कर्मचारी, ग्रामस्थ आणि पोलिसांच्या सतर्कतेमुळे चारही दरोडेखोरांना मुद्देमालासह अटक करण्यात आली. या दरोड्याचा मुख्य सूत्रधार बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक असल्याचे तपासात समोर आले आहे.

शंकर जसक या बडतर्फ उपनिरीक्षकाने २०२३ मध्ये जळगावातील शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत बँक दरोड्याच्या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. तेव्हापासून तो कारागृहात होता. याच काळात खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी गजानन पवार याच्याशी त्याची जवळीक वाढली. दोघांनी कारागृहातूनच भोकर बँक दरोड्याचा कट रचल्याचे उघड झाले आहे.या कटात अंकुश चव्हाण आणि श्रवण चव्हाण यांनाही सहभागी करून घेण्यात आले. चौघांनी मिळून दरोडा टाकल्यानंतर पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांच्या नाकाबंदीमुळे त्यांचा डाव फसला. पोलिसांनी पाठलाग करून चौघांना लुटलेल्या मुद्देमालासह अटक केली. आरोपींना तातडीने जेरबंद करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

दुष्काळमुक्त नांदेडसाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभारा

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आवाहन



नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता जलसंधारणाच्या माध्यमातून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच नियोजनबद्ध प्रयत्न करावेत. श्रमदानातून जलसंधारणाची कामे हाती घेऊन ही चळवळ गावागावांत रुजवावी. दुष्काळमुक्त नांदेडचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकसहभागातून व्यापक लोकचळवळ उभारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा २०२६-२७ च्या अनुषंगाने जिल्ह्यात लोकसहभागातून जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविणे आणि विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी पाणी फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, विभागीय वन अधिकारी मनीषा पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक तालुक्याने दुष्काळाची तीव्रता अधिक असलेल्या गावांची यादी तयार करावी. या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सकारात्मक दृष्टिकोनातून काम करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक गावातील पाच ते सहा व्यक्तींची निवड करून त्यांची नावे प्राधान्याने सादर करावीत. वॉटर कप स्पर्धेच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येक गावातील जलसंधारणाच्या कामात पुढाकार घेऊ शकणाऱ्या व्यक्तींची निवड करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविण्यासाठी गावागावांत शिवार फेरीचे आयोजन करावे. ग्रामस्थांना श्रमदानाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना या चळवळीत सहभागी करून घ्यावे. ही केवळ जलसंधारणाची मोहीम नसून लोकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी चळवळ आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन या संधीचे सकारात्मक कामात रूपांतर करावे, असे आवाहनही त्यांनी केले. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रात राबविण्यात येणारी सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा ही जलसंधारण व पाणलोट व्यवस्थापनावर आधारित महत्त्वपूर्ण मोहीम आहे. या माध्यमातून गावागावांत लोकसहभागातून जलसंधारणाची कामे उभी करणे, पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि पाणी व्यवस्थापनाबाबत ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा प्रमुख उद्देश आहे.

लोकशाही बचावासाठी भाजपचा एल्गार!,नांदेडमध्ये 'अराजकता हटाओ'अभियानांतर्गत भव्य रॅली

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने लोकशाही बचाव, अराजकता हटाओ अभियानांतर्गत शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. राज कॉर्नर येथून सुरू झालेली ही रॅली भाजपा महानगर कार्यालयापर्यंत काढण्यात आली. त्यानंतर आयोजित जाहीर सभेला माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या रॅली आणि सभेमुळे शहरात भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, खा.डॉ. अजित गोपछडे, भाजपा महानगराध्यक्ष आ.अमरनाथ राजुरकर, आ.भीमराव केराम, आ.डॉ. तुषार राठोड, आ.जितेश अंतापुरकर, महापौर सौ. कविता संतोष मुळे, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य-बापू देशमुख, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे, भाजपा युवती मोर्चाच्या अध्यक्षा शांभवी साले, ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख आणि ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.याशिवाय भारतीय जनता पार्टीचे आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, मंडळाध्यक्ष व त्यांचे पदाधिकारी, पक्षाच्या विविध प्रकोष्ठांचे प्रतिनिधी, सर्व मोर्चांचे अध्यक्ष व पदाधिकारी, शक्तिकेंद्रप्रमुख, बूथ अध्यक्ष तसेच पक्षाचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राज कॉर्नरपासून भाजपा महानगर कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या रॅलीत पक्षाचे झेंडे आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. लोकशाहीचे संरक्षण आणि राजकीय अराजकतेविरोधात जनजागृती करण्याच्या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले. जाहीर सभेत उपस्थित मान्यवरांनी अभियानाची भूमिका मांडत पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचे आणि कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पक्षाचे विचार पोहोचविण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांसाठी सरकारशी लढा देणार-सुजात आंबेडकर



नांदेड/प्रतिनिधी-बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे वंचित बहुजन आघाडीकडे यावे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी सरकारशी लढा देवून त्यांना न्याय मिळवून देवू, अशी ग्वाही वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी दिली.

सुजात आंबेडकर शनिवारी (दि.३१) जेन-झेड युवकांशी संवाद या कार्यक्रमानिमित्त नांदेड येथे आले होते. यावेळी शासकीय विश्रामगृहात बार्टी संशोधक विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे प्रवीण खंदारे, विक्की टाकळीकर आणि विकास काळे यांनी त्यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन सादर केले. बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याची विनंतीही त्यांनी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत पीएच. डी. संशोधनासाठी विद्यार्थ्यांना फेलोशिप दिली जाते. मात्र, राज्य शासनाने मागील तीन वर्षात फेलोशिपसाठी जाहिरात प्रसिध्द केली नव्हती. जाहिरात प्रसिध्द करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांना सहा दिवस बेमुदत उपोषण करावे लागले. त्यानंतर जाहिरात प्रसिध्द झाली, मात्र त्यातील जाचक अटींमुळे विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अटी रद्द करण्यासाठी विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलन, साखळी उपोषण व बेमुदत उपोषण केले. त्यानंतर २०२३ च्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी काही अटी शिथिल केल्या. मात्र २०२४ आणि २०२५ च्या विद्यार्थ्यांसाठी त्या अद्याप कायम आहेत. त्यामुळे विद्यार्थी मागील ३३ दिवसांपासून धरणे आंदोलन करीत आहेत. प्रतीक पंचशील आणि मनीषा गवळी यांनी १४ दिवस उपोषण करुनही त्यांच्या मागण्यांची दखल घेण्यात आलेली नाही.

अंध विद्यालयातील विद्यार्थीनींचा अपघात विमा काढून शैक्षणिक साहित्याचे वाटप

किशोर पाटील लगळूदकर यांची सामाजिक बांधिलकी

भोकर/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकरावजी चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भोकर येथे दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि ४० अंध विद्यार्थ्यांचा अपघात विमा काढून किशोर पाटील लगळूदकर यांनी सामाजिक बांधिलकी जपली.

२८ ऑक्टोबर २०२६ रोजी माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकरावजी चव्हाण यांच्या वाढदिवस असल्याने कुठलाही बडेजावपना न करता महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट कोसळल्याने हार तुरे व आगाऊ खर्च न करता सामाजिक बांधिलकी जोपासून अंध विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर पाटील लगळुदकर यांनी त्यांचे भोकर येथील सावित्रीबाई फुले अंध मुलींची निवासी कर्मशाळेतील विद्यार्थ्यांना मॅजिक स्टिक, ब्रेल पाटी व चेस बोर्ड या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच कर्मशाळेतील ४० विद्यार्थ्यांचा अपघात विमा काढण्यात आला. कै. सटवाजी पाटील किन्हाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, लगळूदचे अध्यक्ष श्री. किशोर पाटील लगळूदकर व सचीव अशोक मारोतराव पाटील लगळूदकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोकर नगर परिषदेचे नगराध्यक्ष भगवानरावजी दंडवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, सभापती जगदीश पाटील भोसीकर, उपसभापती बालाजी शामनवाड, महामंत्री रामचंद्र मुसळे, संचालक राजू पा. दिवशीकर, भाजपचे



तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी, संचालक राजेश अंगरवार, केशव पाटील पोमनाळकर, सारंग मुंदडा, व्यंकटराव पा. महागावकर, यादव सौळंके, मनोज चव्हाण यांच्यासह इतर मान्यवरांचीही उपस्थिती होती. दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि सुरक्षिततेची काळजी घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी तसेच दैनंदिन जीवनात मदत होणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला. कार्यक्रमाला दिव्यांग शाळेतील विद्यार्थी, कृषी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी विद्यालयाच्या प्राचार्य सौ.फुलारी, सौ.कोमल गाडे, सौ. चौदंते, सुनील नाईक, पाटील तेले अंध विद्यालयाच्या अधीक्षक शिंदे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर गोडबोले यांनी केले तर आभार जगदीश पा. कदम यांनी मानले.

यात्री निवास ते अबचलनगर जोडरस्त्याच्या कामाला सुरुवात

आ.आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते उद्घाटन

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील अबचलनगर ते यात्री निवास पोलीस चौकी या जोडरस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. आ.आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते नारळ फोडून या कामाचा शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीच्या मागणीला अखेर यश आले आहे.

मलनिस्सारण वाहिनीच्या कामासाठी मे महिन्यात हा रस्ता खोदण्यात आला होता. त्यानंतर रस्ता उखडलेल्या अवस्थेतच राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात रस्त्यावर घसरगुंडी निर्माण होऊन अनेकदा छोटे-मोठे अपघात झाले. त्यातच गिट्टी टाकण्यात आल्याने दुचाकींसह अन्य वाहनांच्या वाहतुकीतही अडथळे निर्माण होत होते. अनेक वेळा मोठी वाहनेही या रस्त्यावर अडकून पडली होती. या परिस्थितीमुळे परिसरातील शीख बांधवांसह नागरिकांनी रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी स्वतः या विषयात लक्ष घातले. तसेच संबंधित विभाग आणि कंत्राटदाराला रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार अखेर कामाला सुरुवात झाली आहे. आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते नारळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, नगरसेवक गुरमितसिंघ (डिंपल) नवाब, नगरसेवक धीरज यादव, शिवसेना सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, सहसंपर्कप्रमुख गुरमितसिंघ टमना, उपजिल्हाप्रमुख अवतारसिंघ पहिरेदार, गुरमीतसिंघ महाजन, रोशनसिंघ जहागीरदार, मनप्रीतसिंघ कुंजीवाले, महिंदरसिंघ लांगरी, तेजपालसिंघ खेड, गुरदीपसिंघ संधू, नानकसिंघ फौजी, तेजिंदरसिंघ ग्रंथी, जीतसिंघ दुकानदार, इंदरसिंघ सरदार, गुरुसिमरनसिंघ सरदार, अंगदसिंघ सिद्धू, सुदिन पाटील बागल, रवि थोरात यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.आनंदराव पाटील बोंढारकर म्हणाले की, उखडलेल्या रस्त्यामुळे या भागातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. भविष्यात अशा अडचणी नागरिकांना भासू नयेत, यासाठी प्रयत्न केले जातील.

जाहीर प्रगटन

मा.श्री ए.जी.चव्हाण, ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४६२/२०२६

गयाबाई व इतर विरुध्द निरंक

अर्जदार - १. गयाबाई भ्र.मरीबा गजभारे वय : ६० वर्षे, धंदा मजुर, २. धम्मपाल पि. मरीबा गजभारे वय : ४८ वर्षे, धंदा मजुरी, ३. सिध्दार्थ पि.मरीबा गजभारे वय ४५ वर्षे, धंदा मजुर, ४. दयानंद पि.मरीबा गजभारे वय : ४३ वर्षे, धंदा मजुर, सर्व रा. पकंज नगर, धनेगाव, ता. जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

दावा - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत मरीबा पि. नागोराव गजभारे यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ ही त्यांची मुले आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १०/०१/२०२५ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत मरीबा पि. नागोराव गजभारे यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक १६/११/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर नांदेड.

जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड, यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज १६६४/२०२६

कमळबाई व ईतर वि. निरंक

ने.ता.१०/१२/२०२६

अर्जदार:- १. कमळबाई भ्र.रामराव देशमाने, वय : ४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा.वाघाळा,मीरानगर, शाहुनगर, तरोडा बु.नांदेड, २. दीपाली पि.रामराव देशमाने, दीपाली भ्र.सागर गाजरे वय : ३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिव प्रेरणा चाळ नं.१, रुम क्र.२, गणेशनगर, गणेश मंदीर मागे, दिवा पु.ठाणे, ३. दगडु पि.रामराव देशमाने, वय : ३३ वर्षे, धंदा-मजुरी, रा.घर क्र.१०-३-३१२, मीरानगर, हडको, सिडको, नांदेड, ४. साईनाथ पि.रामराव देशमाने, वय : ३० वर्षे, धंदा-शिक्षण, रा.घर क्र.१०-३-३१२, मीरानगर, हडको,सिडको,नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रामराव पि.अर्जुन देशमाने यांचा मृत्यु दिनांक १८/०१/२०२६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मुलगी व अर्जदार क्र. ३ व ४ हे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ४ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १०/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात

Shaikh magdum & other's v/s Nil

Civil M.A.- 1540/2026

अर्जदार : १. शेख मगदुम शेख बाबुशा वय ५४ वर्षे, धंदा शेती, २. शेख शादुला शेख बाबुशा वय ५२ वर्षे, धंदा शेती, ३. शेख अमीनशा शेख बाबुशा वय ४७ वर्षे, धंदा शेती, ४. शेख इसाक शेख बाबुशा वय ४५ वर्षे, धंदा शेती, ५. शेख मुस्तफा शेख बाबुशा वय ४६ वर्षे, धंदा शेती सर्व रा. पिंपळगाव कोरका ता. जि. नांदेड, ६. फरजाना अहमद शेख वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. मेंडका ता.जि.नांदेड, ७. फातमाबी अमनहुल्ला खॉ पठाण वय ६६ वर्षे, धंदा घरकाम रा. जामगव्हान ता.जि.हिंगोली

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळविण्याकरीता अर्ज.

ज्या अर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार शेख हलीमाबी भ्र. शेख बाबुशा @ बाबुशा पि. अमीनशा शेख यांचे वारस आहेत. मयत शेख हलीमाबी भ्र. शेख बाबुशा यांचा दि.२९/०५/२०२० आणि बाबुशा पि.अमीनशा शेख यांचा दि.२९/०३/२०१७ रोजी मृत्यु झाला आहे.

वर नमूद अर्जदारा शिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहुन या न्यायालयात दि.०१/१२/२०२६ रोज किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दि. ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
३ रे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्या.क.स्तर नदिड

२०२ कोटींचा पैनगंगा बंधारा पूर्णत्वाकडे;पाणी अडविण्याचा मार्ग मोकळा

९० टक्के काम पूर्ण,उर्वरित काम १५ दिवसांत होणार



किनवट/प्रतिनिधी-निर्माणाधीन असलेल्या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. परतीचा पाऊस सदृश्यस्थिती दिसत असल्याने कदाचित एखाद्या जोरदार पावसाची प्रतीक्षा असून, पाऊस पडल्यास बंधाऱ्यात गेट टाकून पाणी अडवण्याची शक्यता व्यक्तविली आहे.

शासनाने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता धरणे व बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविण्याबाबतच्या जाचक अटी काही प्रमाणात शिथिल केल्या आहेत. त्यामुळे किनवट च्या नवनिर्मित बंधाऱ्यात पाणी साठविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती गोदावरी पाटबंधारे विभागाचे अभियंता पंकज गांवडे यांनी ही माहिती दिली. किनवट शहरालगत पैनगंगा नदीवर तब्बल २०२ कोटी रुपये खर्चून १३ गेटचा उच्च पातळी बंधारा उभारण्यात येत आहे. दीड ते दोन वर्षांपूर्वी या कामाचे भूमिपूजन झाले होते. सध्या बंधाऱ्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम येत्या १५ दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या बंधाऱ्यामुळे किनवट शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असून, परिसरातील शेकडो हेक्टर शेतीलाही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. मात्र, यंदा निसर्गाच्या अवकृपेमुळे पैनगंगानदी मोठ्या प्रमाणात कोरडी पडल्याने पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. दरम्यान, सध्या देशभरात 'अर्णभ' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे.किनवटच्या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याचे भूमिपूजन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्यानंतर गोदावरी पाटबंधारे विभागाच्या देखरेखीखाली अवघ्या २४० दिवसांत रात्रंदिवस काम करून बंधाऱ्याचे काम पूर्णत्वाकडे नेण्यात आले. आता केवळ गर्डरवर स्लैब टाकण्याचे काम शिल्लक असून, तेही येत्या १५ दिवसांत पूर्ण होणार असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे लवकरच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात साकार होण्याचा मार्ग मोकळा झालाय.

ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याचा केंद्राने तातडीने निर्णय घ्यावा-खा.पवार

मुंबई/प्रतिनिधी- मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याबाबत केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा असे आवाहन ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांनी सोलापूर येथील पत्रकार परिषदेत केले.

दिल्लीतील इंडिया आघाडीच्या आंदोलनाबाबत पत्रकारांनी खा.शरद पवारांना विचारले असता ते म्हणाले की, केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा मुद्दा उपस्थित केला. या मागणीवर केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. यासंदर्भात निर्णय होत नसल्याने विरोधी पक्ष एकत्र आले असून, खासदार सुप्रिया सुळे आणि संजय राऊत हे आंदोलनात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, सध्या आपले प्रमुख लक्ष दुष्काळ, पाणीटंचाई आणि चाऱ्याच्या प्रश्नाकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.उजनी येथे प्रस्तावित असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) डेटा सेंटर प्रकल्पावरून सुरू असलेल्या चर्चेवरही पवार यांनी भाष्य केले. एआय आले म्हणजे पाणी गेले असे नाही. मात्र, पाण्याचा जपून वापर केला पाहिजे, असे ते म्हणाले. या प्रकल्पाबाबत स्थानिक नागरिकांच्या भावना आणि भूमिका जाणून घेण्यासाठी आपण स्वतः उजनी येथे भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्पाच्या अनुषंगाने काही दुरुस्ती किंवा बदल करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे यंदा पवार कुटुंबीय दिवाळी साजरी करणार नसल्याचे शरद पवार यांनी भावनिक शब्दांत सांगितले. यंदा आमच्याकडे दिवाळी नाही. यावेळी आम्ही दिवाळी करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्याविना येणारी ही पहिलीच दिवाळी असल्याने कुटुंबीयांवर दुःखाचे सावट असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून व्यक्त झाले.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर उद्या आरोग्य समित्या व नागरिकांशी साधणार थेट संवाद

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आरोग्य संवाद यात्रा २०२६ अंतर्गत राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर हे उद्या, सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्यातील विविध आरोग्य समित्यांचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी, खासगी वैद्यकीय व्यावसायिक आणि नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. दूरदृश्यप्रणाली आणि दूरध्वनीच्या माध्यमातून हा संवाद होणार आहे.

राज्यभरात दि.१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत आरोग्य संवाद यात्रा २०२६ राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून घडवूया माझं गाव आरोग्यसंपन्न गाव ही या उपक्रमाची संकल्पना आहे. आरोग्य सेवांमधील लोकसहभाग वाढविणे, आरोग्य समित्यांचे सक्षमीकरण करणे आणि स्थानिक पातळीवरील आरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करणे, हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे.आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर हे सकाळी ९ वाजता नांदेड शहरातील खासगी वैद्यकीय व्यावसायिकांशी आरोग्यविषयक विविध महत्त्वाच्या बाबींवर संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम कै. डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहातून सकाळी १० वाजता दूरदृश्यप्रणाली व दूरध्वनीद्वारे जिल्ह्यातील विविध आरोग्य समित्यांचे पदाधिकारी, सदस्य आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यात येणार आहे.या संवादामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय एकात्मिक आरोग्यवर्धिनी समित्या, रुग्ण कल्याण समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रस्तरीय जन आरोग्य समित्या, ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या तसेच शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत महिला आरोग्य समित्यांचा सहभाग अपेक्षित आहे.या उपक्रमातून आरोग्य समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे, स्थानिक आरोग्यविषयक अडचणी जाणून घेणे, आरोग्य सेवांचा दर्जा सुधारणे आणि शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे यावर भर देण्यात येणार आहे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत आरोग्यविषयक प्रश्नांवर थेट संवाद साधून नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेतील सहभाग अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून केला जाणार आहे.

राष्ट्रीय एकता परेडमध्ये माहूरचे भूमीपुत्र शिवम गिऱ्हे यांचा सहभाग

माहूर/प्रतिनिधी-राष्ट्रीय एकता दिनानिमित्त गुजरात राज्यातील एकतानगर (केवडिया) येथे ३१ ऑक्टो. रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या राष्ट्रीय एकता परेडमध्ये महाराष्ट्र पोलीस सी-६० दलाने विशेष सहभाग नोंदविला. या परेडमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या गडचिरोली येथील सी-६० पथकाचे नेतृत्व कॅंटिंजेंट कमांडर आयपीएस भामरे यांनी केले. तर प्लाटून कमांडर म्हणून पीएसआय शिवम गिऱ्हे आणि पीएसआय दीपक पाटील यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली सी-६० दलाचे १४७ जवान या भव्य परेडमध्ये सहभागी झाले होते.



या राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक परेडचे थेट प्रक्षेपण माहूर पोलीस ठाण्यात करण्यात आले होते. यावेळी पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सपोनि शरद घोडके, ज्येष्ठ पत्रकार वसंत कपाटे, नंदकुमार जोशी, राज ठाकूर, सुरेश गिऱ्हे, प्राचार्य विश्वास जाधव तसेच अविनाश सातव, सुधीर जांबूतकर आदी मान्यवरांसह जगदंबा विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने देशाच्या एकात्मतेचे, शौर्याचे आणि पोलीस दलाच्या कर्तव्यनिष्ठेचे दर्शन घडविणाऱ्या या परेडमध्ये माहूरचे भूमिपुत्र पीएसआय शिवम गिऱ्हे यांचा सहभाग माहूरकरांसाठी विशेष अभिमानाची बाब ठरली आहे. आपल्या मुलाने देशाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय परेडमध्ये सहभागी होऊन महाराष्ट्र पोलीस दलाचे प्रतिनिधित्व केल्याचा आनंद व्यक्त करताना पत्रकार सुरेश गिऱ्हे यांनी हा क्षण आपल्या आयुष्यात कायम स्मरणात राहणारा असल्याची भावना व्यक्त केली.

पाण्याच्या शोधात माकडांचा शेतशिवारात उच्छाद

कंधार-मुखेड तालुक्यांत पिके आणि फळबागांचे नुकसान;जंगलात पाणवठे निर्माण करण्याची शेतकऱ्यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाईचे संकट आतापासूनच गडद होऊ लागले आहे. माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असतानाच आता जंगलातील वन्यप्राण्यांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. जंगलातील पाणवठे आटल्याने पिण्याच्या पाण्याच्या शोधात माकडांच्या टोळ्या थेट शेतशिवारात घुसत असून, कंधार आणि मुखेड तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.



अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्येच पाणीटंचाई जाणवू लागली असून, मार्च-एप्रिलमधील कडक उन्हाळा अद्याप बाकी आहे. अशा परिस्थितीत जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडल्याने वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू झाली आहे. माकडांच्या टोळ्या गावालगतच्या शेतांमध्ये दाखल होत असून, पिकांची नासधूस करीत आहेत. कंधार तालुक्यातील नागलगाव येथील शेतकरी कॉ.शिवाजी फुलवळे यांच्या शेतातील आंब्याच्या बागेचे या माकडांनी मोठे नुकसान केले आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या पीक व फळबागांनाही माकडांच्या उपद्रवाचा मोठा फटका बसत आहे. आधीच पावसाच्या कमतरतेमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता माकडांच्या उपद्रवाचे नवे संकट उभे राहिले आहे. पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात पहारा द्यावा लागत आहे. वन्यप्राण्यांची पाण्याची गरज भागविण्यासाठी जंगलातच पाण्याची व्यवस्था केली असती तर माकडांना शेतशिवारात येण्याची वेळ आली नसती, अशी भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. वनविभागाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन जंगल परिसरातील पाणवठ्यांची पाहणी करावी. आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करून त्यात नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे. त्यामुळे वन्यप्राण्यांची तहान भागण्यासोबतच शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे नुकसानही टाळता येईल. आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कंधार-मुखेड तालुक्यांतील शेतकऱ्यांकडून होत आहे.

एक देश,एक निवडणूक विषयावर युवकांची अभ्यासपूर्ण मते;विकसित भारत युवा संसद उत्साहात

नांदेड/प्रतिनिधी-युवकांमध्ये नेतृत्वगुण, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवरील चिकित्सक विचारशक्ती विकसित करण्याच्या उद्देशाने माय भारत, नांदेड यांच्या वतीने यशवंत महाविद्यालयात जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसद २०२६-२७ उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील ५० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग नोंदवत एक देश, एक निवडणूक या विषयावर आपली मते प्रभावीपणे मांडली.


कार्यक्रमाचे उद्घाटन यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांच्या हस्ते झाले. युवकांनी राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांचा सखोल अभ्यास करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.या स्पर्धेत सहभागी युवकांनी एक देश, एक निवडणूक संकल्पनेचे फायदे, आव्हाने तसेच भारतीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेवरील संभाव्य परिणाम यांवर अभ्यासपूर्ण मते मांडली. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. शिवाजी सूर्यवंशी, विष्णू गोदबोले, सारिका बकवाड पाटील, प्रा. रितीशा नालवडे आणि नागसेन तुळसे यांनी काम पाहिले.या स्पर्धेत कु मेहक पठाण यांनी प्रथम, अभिजित कोलते यांनी द्वितीय, तर कु अनीशा डोडके यांनी तृतीय क्रमांक पटकावला.यावेळी माय भारतच्या जिल्हा युवा अधिकारी कु अशनी अनिल कानकटे यांनी युवकांनी संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, चिकित्सक विचारशक्ती आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. युवा संसदेसारखे उपक्रम युवकांमध्ये आत्मविश्वास, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. सायननाथ बिंदगे, इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. रत्नमाला म्हस्के यांच्यासह प्राध्यापक, परीक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी जिल्हा युवा अधिकारी कु अशनी कानकटे यांनी आभार मानले. विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या केंद्र शासनाच्या उपक्रमाचा भाग असलेल्या युवा संसदेच्या माध्यमातून युवकांना विकसित भारत @२०४७ या संकल्पनेशी जोडणे, राष्ट्रीय विषयांवर विचारमंथन घडविणे आणि देशाच्या विकासप्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

भाजपचे'रामराज्या'च्या नावाखाली'रावणराज्य'

खा.संजय राऊतांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात

नवी दिल्ली:केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (१ नोव्हेंबर) दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने महारॅलीचे आयोजन करण्यात आले. या आंदोलनात सुमारे २० विरोधी पक्ष सहभागी होणार असल्याने राजधानीतील राजकीय वातावरण तापले आहे. या महारॅलीवर भाजपकडून टीका होत असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार निशाणा साधला. रामराज्याच्या नावाखाली भाजपने रावणराज्य निर्माण केले आहे. हे रावणराज्य संपवण्यासाठी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही एकवटले आहोत, असा घणाघात राऊत यांनी केला.

रामलीला मैदानावरील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलताना राऊत यांनी केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. सरकार आणि सरकारने नियुक्त केलेले मुख्य निवडणूक आयुक्त लोकशाहीच्या विरोधात काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ज्ञानेश कुमार हे पदाला चिकटून बसले असून त्यांना खुर्चीवरून हलविण्यासाठी जनतेचा दबाव निर्माण करावा लागेल. त्यासाठीच देशभरातून नागरिक दिल्लीतील रामलीला मैदानावर एकत्र येत आहेत. सरकारवर दबाव आणण्यासाठी आंदोलनांची मालिका सुरूच राहील, असे राऊत यांनी स्पष्ट केले. भाजपकडून होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना राऊत म्हणाले की, भाजपच्या टीकेला आता काही अर्थ राहिलेला नाही. देशात सुरू असलेल्या रावणलीलेविरोधात आवाज उठविण्यासाठी रामलीला मैदानाची निवड करण्यात आली आहे. राहुल गांधी काय आहेत, हे देशातील जनता ठरवेल. जनतेमध्ये असंतोष असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे ज्ञानेश कुमार यांना पदावर कायम ठेवत असल्याची टीका त्यांनी केली.रावणाचा दाखला देत राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला. रावण हा विद्वान, शिवभक्त आणि उत्तम प्रशासक होता. राम आणि रावण यांच्यातील लढाई ही सत्य आणि असत्याची होती. भाजपने रामराज्याची संकल्पना समजून घेतली पाहिजे; मात्र रामराज्याच्या नावाखाली रावणराज्य निर्माण करण्यात आले आहे, असा आरोप त्यांनी केला. भाजपला लक्ष्य करताना राऊत यांनी राममंदिर आणि अयोध्येचाही उल्लेख केला. आमची सेना प्रभू श्रीरामांच्या प्रेरणेतून उभी राहिली आहे. ज्यांनी अयोध्या लुटली आणि प्रभू श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील चोरीचे आरोप झेलले, त्यांनी आम्हाला रामकथा शिकवू नये, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर टीका केली. दिल्लीतील महारॅलीत शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने आपण आणि पक्षाचे अन्य नेते सहभागी होणार असल्याचे राऊत यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यादेखील पक्षाच्या वतीने उपस्थित राहणार आहेत. उद्धव ठाकरे यांनी आपल्याला आंदोलनासाठी दिल्लीला पाठविले असून, मुंबईतील महत्त्वाच्या कामांमुळे ते स्वतः मुंबईत थांबले आहेत. आमचे सेनापती मुंबईत असून, त्यांनी आम्हाला या लढ्यात सहभागी होण्याचे निर्देश दिले आहेत, असे राऊत म्हणाले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशपातळीवर सुरू असलेल्या लढ्याप्रमाणेच महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनीही संघर्ष केला आहे, असे सांगत राऊत यांनी ठाकरे पिता-पुत्रांच्या भूमिकेचे समर्थन केले. सरकारकडून लहान व्यापाऱ्यांना धाक दाखविला जात असल्याचा आरोप करत अशा व्यापाऱ्यांच्या पाठीशी शिवसेना ठामपणे उभी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



पान १ वरुन

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाणी आणि...

त्यामुळे आगामी काळात दुष्काळग्रस्त भागांसाठी सरकारकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. राज्यातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत असल्याने उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी नमूद केले. पुणे परिसरातील खडकवासला आणि इतर धरणांमधील पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आजपासून जून महिन्यापर्यंत पाण्याची काळजी घ्यावी लागणार आहे. उपलब्ध पाणीसाठ्यावर लक्ष ठेवून त्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. पाणीटंचाईची संभाव्य तीव्रता लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले.

दिल्लीत विरोधकांची महारॅली...

बाजारपेठांमधून खरेदी करण्याचे आवाहन केले. त्यामुळे राजकीय आंदोलनासोबतच स्थानिक व्यापाऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचा संदेशही त्यांनी दिला आहे. इंडिया आघाडीचे प्रमुख नेते खुल्या बसमधून रामलीला मैदानाकडे रवाना होणार आहेत. काँग्रेसच्या इंदिरा भवन कार्यालयाबाहेरून या प्रवासाला सुरुवात होऊन नेते मिंटो ब्रिजपर्यंत जाणार आहेत. तेथून महारॅलीला सुरुवात होऊन ती रामलीला मैदानावर पोहोचणार आहे. या रॅलीत विविध विरोधी पक्षांचे प्रमुख नेते आणि कार्यकर्ते सहभागी होणार असल्याने मोठ्या गर्दीची शक्यता वर्तविण्यात आली आहे. महारॅलीच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी व्यापक सुरक्षा व्यवस्था केली आहे. रामलीला मैदान आणि आसपासच्या परिसरात चार हजार पोलीस तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवणार असून, ड्रोनच्या माध्यमातूनही संपूर्ण परिसरावर नजर ठेवली जाणार आहे. गर्दीचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. आंदोलनादरम्यान समाजकंटकांकडून कोणतेही विघातक कृत्य घडू नये, यासाठीही खबरदारी घेण्यात आली आहे. एकीकडे ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून विरोधकांनी आंदोलनाची धार तीव्र केली आहे, तर दुसरीकडे या आंदोलनावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. लाखभर आंदोलकांच्या संभाव्य सहभागामुळे रामलीला मैदानावरील ही महारॅली राजधानीतील महत्त्वाची राजकीय घडामोड ठरण्याची शक्यता आहे.

काँग्रेसला चीनकडून देणगी...

त्यांच्या पक्षांची सरकारे आहेत, तेथील मुख्यमंत्र्यांनीही राजीनामे द्यावेत, असे आव्हान त्यांनी दिले.विरोधकांचे व्होट चोरीचे कथानक महाराष्ट्रात चालणार नाही, असे सांगत शिंदे यांनी विरोधकांच्या आरोपांना राजकीय प्रत्युत्तर दिले. देशातील लोकशाही आणि संविधानाबाबत विरोधकांकडून उपस्थित करण्यात येणाऱ्या मुद्द्यांवरही त्यांनी आक्षेप नोंदविला.दरम्यान, विधानपरिषद निवडणुकीतील पराभवानंतर महायुतीतील घटक पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी महायुतीच्या नेत्यांना एकत्र राहण्याचे आवाहन केले. आपापसांतील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ठाण्यातील या यात्रेतून भाजपने काँग्रेसच्या महारॅलीला प्रत्युत्तर देताना चीनशी संबंधित कथित देणगी, संविधान आणि निवडणूक प्रक्रियेचे मुद्दे ऐरणीवर आणले. फडणवीस यांनी चीनकडून मिळणाऱ्या कथित आर्थिक मदतीबाबत प्रश्न उपस्थित केले, तर शिंदे यांनी २०१९ मधील महाराष्ट्रातील सत्तास्थापनेचा संदर्भ देत व्होट चोरीच्या आरोपांना उत्तर दिले. त्यामुळे ठाण्यातील या सभेत केंद्रातील राजकारणासह महाराष्ट्रातील महायुतीच्या अंतर्गत राजकीय घडामोडींचेही पडसाद उमटले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४